## बेंदुर. बैलांचा सण

पोळ्याच्या दिवशी सकाळी, बैलांना अंघोळ घालणे, सजवणे, रंगवणे हेच काम असाते. बैल सुद्धा प्रेमाने त्याला साथ देतात. घराघरात गोड पदार्थ तयार करतात. घरो घरी बैलांना घेऊन जातात.प्रत्येक घरी त्यांची पूजा करतात, नैव्येद्य दाखवतात. जिकडे तिकडे आनंद पसरलेला दिसतो.मातीची बैल जोडी बनवुन देवाऱ्यावर त्याची सुद्धा पूजा केली जाते. लहान मुले मातीची बैल जोडी बनवीतात व ते सुद्धा आनंद लुटतात, इंटरनेट च्या जगात पोळा हा शब्द इंटरनेट वरच वाचायला मिळतो. पार विदेशात बसून नेट वरून आज पोळा आहे हे समजते.

आपल्या या देशाची प्रतिमा पूर्वीपासून कृषी प्रधान देश अशीच आहे. म्हणूनच पोळा घरा घरात साजरा होत असतो. पूर्वीच्या काळी आपल्या देशात कारखाने व इतर उद्योग नव्हतेच मुळी. फक्त शेती एके शेती. एकदाचा पावसाळा सुरु झाला, पेरण्या झाल्या कि शेतकऱ्याचे काय संपले. तसेच पेरण्या करताना बैल रात्रंदिवस कामात जुंपलेली ती सुद्धा थकलेली त्यांचा व स्वताचा थकवा दूर करण्यासाठी सन साजरा करणे जास्त चांगले. त्या लहानश्या गावात इतर मनोरंजन ते काय. तेव्हा आता सारखा टीवी नव्हताच. त्यामुळे शेतकरी मनोरंजन कसा करू शकणार? तशेच त्याचे दैवत हे बैलच.आपल्या देशाची ती परंपरा आहे आपण दगडाला सुद्धा देव मानले आहे. त्यातून नरसिम्ह निघाला आहे. हेच आपले मोठेपण हेच आपले संस्कार आहेच. आणि म्हणून हा सन साजरा करण्याची प्रथा सुरु झाली असावी.

## स्री. बैलांचा सण: बैल पोळा!

भारत हा शेतकऱ्यांचा देश असल्याने हा एक राष्ट्रीय सण - मुक्या प्रान्यांसाठी मानसासारख्या

जनावरानं साजरा केलेला एकुलता एक सण आहे. पोळ्याच्या दिवशी शेतकरी बैलांच्या आदी उठतात. बैलांना नदीवर किंव्हा वड्यावर नेऊन निरमा लाऊन नाहु घालतात. शिंगे तासली जातात. नाकात नवी येसण आणि गळ्यात नवा कासरा लावतात. पायची खुरं कापुन पत्री मारत्यात.

आपल्याला नाय का आइ दिवाळीला लवकर उठ्वते आन् मोती साबणानं आंगुळ घालुन नवी कापडं देत्यात. तस या दिवशी बैलांचा लय थाट आसतुय. त्यांनला दिवसभर कामाला लावत न्हाइत. बैलांच्या वशिंडावर हळद व आसेलच तर तेल/ तुप लाऊन मालिश करत्यात. मोठं वशिंड असणारा बैल हा पैलवान बैल असतो. सर्व्या आंगावर रंगाचं नायतर गेरुचं ठिपके देत्यात आन् आपल्या हाताचे शिक्के पण मारत्यात. शिंगावर शेंदुर नायतर इंगुळ लावुन त्यावर रंग-बिरंगी बेगडं चिटकवत्यात. बेगाड लय नाजुक असतं. ते दोऱ्याने कापत्यात व त्याच्या पट्ट्या करुन ते शिंगावर लावत्यात. शिंगाच्या टोकाला चिलिमीसारखे पितळेचे एक इभुषण घालत्यात. ते पडु नये म्हणुन एक - एक मोळा बी मारत्यात. पण त्याच्यानं शिंगातुन रगत येत नाही. त्याच्यावर उभे गोंडे लावतात. गळ्यात चंगाळ बांधतात. चंगाळ घराच्या आडाला बांधल्यामुळे ते धुराने काळं कळ-कुळीत झालेलं असतं. बैलाच्या गळयात बांधाच्या आदी ते निरम्याने धुवावे लागतं. नाही तर पांढऱ्या बैलावर त्याचा काळा रंग लागतो. बैल चालताना त्या चंगळाचा लय मस्त आवाज व्हतो. गळ्यात चंगाळ्याबरोबर कवड्याच्या माळाबी बांधत्यात. पायात काळ्या आन् लाल रंगाचं करदोड्याचं तोडं बांधत्यात. त्यामुळं बैल लय भारी दिसतो आन् तेला द्रुष्ट लागत नाय.. म्हणुन मी अजुनपर्यंत माझ्या पायात काळा करदोडा बांधतो.

पाठीवर नक्शी केलेलं झुल टाकत्यात. आन् त्यां सगळ्याशिनला गावातन वाजवत नेत्यात. त्यांच्या मोरं हालगी वाजणार मस्त ठेका लाउन वाजवत असतो. डांग नाकी कोकणाकी..डांग नाकी कोकणाकी.. ड डांग डांग नाकी कोकणाकी.. असा आवाज आसतोय.

गावातल्या येशीवर सगळी बैलवाली मंडळी गोळा होत्यात .. मग वाजंत्री .. नगारं .. ढोल.. सनया वाजवुन झडत्या म्हणत्यात. जिकणाऱ्या पार्टीस सरपंच नायतर पाटील इनाम देत्यात. त्यातपन येकादा आगावपणा करुन भाशनाला उभारतो. बैलाची तारीप करत्यात. आन् पावसा-पान्याच्या गोश्टी पन. पान तंबाकुचं देनं-घेनं होतं आन् मग पोळा फुटतो. मग संध्याकाळी परतीच्या वाटंवर मारतीच्या देवळाला दर्शनाला जात्यात. घरी आल्यावर पुन्यांदा बैलांनला आन् बैलकऱ्यास ववाळतात. बैलाशिनला खायला पुरणाची पोळी आन् सुग्रास - पेंडीचा निवद देत्यात. बैलकऱ्यासबी नवी कापडं मिळत्यात. दिवसबर दोगंबी लय खुशीत असत्यात.

असा हा बैल पोळा